# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

☎ / फॅक्स २५६५६२३४ Email : jdtepu@pn3.vsnl.net.in. Web.ropune.org.in


**अत्यंत महत्वाचे**

जा.क्र.विकापु/विवि/गुणवत्ता यादया/२००९-१०/१०११५ दिनांक : 06/11/2009

प्रति,

प्राचार्य,
प्रथम वर्ष / थेट व्दितीय वर्ष पदवी अभियांत्रिकी / वास्तुशास्त्र /
हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी/ फार्मसी अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय : शैक्षणिक वर्ष २००९-१० मधील प्रथम वर्ष / थेट व्दितीय वर्ष पदवी अभियांत्रिकी / वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी/ फार्मसी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्ष थेट व्दितीय वर्ष प्रवेशित विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादया प्रमाणित करण्याबाबत

संदर्भ : या कार्यालयाचे पत्र क्र. विकापु/विवि/गुणवत्ता यादया/२००९-१०/९८१२ दिनांक २६/१०/२००९

उपरोक्त विषयासंदर्भात या कार्यालयाच्या अधिपत्याखाली असणा-या सर्व शासकीय / शासकीय अनुदानित आणि विना अनुदानित प्रथम वर्ष / थेट व्दितीय वर्ष पदवी अभियांत्रिकी /वास्तुशास्त्र / हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलॉजी/ फार्मसी अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २००९-१० मध्ये प्रथम वर्ष / थेट व्दितीय वर्ष अभ्यासक्रमाच्या प्रवेशीत विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी प्रमाणित करण्यासाठी या कार्यालयाकडून आवश्यक असणा-या सर्व कागदपत्रासह संस्थाच्या नावासमोर दर्शविलेल्या तारखांना उपस्थित राहण्याबाबत सुचित केले होते,

मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सुचीत केल्यानुसार गुणचत्ता यादी तपासणीच्या दिनांकापुर्वी एक दिवस अगोदर संकेत स्थळावर अद्ययावत केलेली प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी प्रिंट काढून प्राचार्यांची स्वाक्षरी व संस्थेचा शिक्का मारून सादर करावी. मा. संचालकांच्या संकेत स्ळाळावरील पुर्वी प्रिन्ट काढलेली प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी प्रमाणित केली जाणार नाही याची सर्व संस्था चालकांनी नोंद ध्यावी.

सही

(डी एन. शिंगाडे)
प्र. सहसंचालक ,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत : श्री.. एस. बी. शिन्दे, प्रोग्रॅमर याना कळविण्यात येते की, सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.